| MHWR030022682021 | खटला दाखल तारीख | – | ०९.०४.२०२१ |
|---|---|---|---|
| | खटला नोंदणी तारीख | – | ०९.०४.२०२१ |
| | खटला निकाल तारीख | – | ०१.०९.२०२६ |
| | कालावधी | ०५व, ०४ म, २३ दि. | |

भाग –' अ '

Form No. XXXII

(Title Page of the Judgment)

(Para 44 (i) of Chapter VI of Criminal Manual)

विद्यमान मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी – श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

नियमित फौजदारी खटला क्र.२४९/२०२१ — अपराध क्र.१६०/२०२१

निशाणी क्र.२९

महाराष्ट्र शासनातर्फे पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे देवळी, ता व जि. वर्धा. ... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

माया सिध्दार्थ मानेकर,
वय अंदाजे ५८ वर्ष, कामधंदाः मजुरी,
राह. काजळसरा, ता.देवळी, जि.वर्धा. ... **आरोपी**

=========================================

सरकार पक्षातर्फे सरकारी वकील – श्री.एस.एम.दुंगे.

आरोपीतर्फे अधिवक्ता – श्री.बी.डब्लु.चौधरी.

=========================================

**भारतीय दंड विधानाचे कलम ४३५ प्रमाणे दोषारोप.**

भाग –' ब '

(Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | १५.०२.२०२१ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | १५.०२.२०२१ |
| ३ | दोषारोप पत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०९.०४.२०२१ |
| ४ | दोषारोप निश्चिती दिनांक | २७.०१.२०२६ |
| ५ | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०४.०३.२०२६ |
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ०१.०९.२०२६ |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | ०१.०९.२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | माया सिध्दार्थ मानेकर | सुचनापत्रावर. | ---- | भा.दं.स. कलम ४३५ अन्वये | दोषी | दोषी | --- |

## भाग –' क'

**(Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual)**

**LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES**

**अ. अभियोग पक्ष –**

| अनु. क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ.रत्नमाला वासुदेवराव बावणकर | १६ | फिर्यादी. |
| २. | वासुदेव मारोतराव बावणे | १७ | साक्षीदार. |
| ३. | मोहन जानरावजी हुस्नापुरे | १८ | साक्षीदार. |
| ४. | पांडुरंग प्रल्हादाराव भगत | १९ | घटनास्थळ पंच. |
| ५. | मनोज गुलाबराव नांदुरकर | २४ | तपासी अंमलदार. |

**ब. <u>बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर</u> –**

| **अनु.क्र.** | **नांवे** | **निशाणी** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**क. न्यायालयीन साक्षीदार असतील तर -**

| **अनु.क्र.** | **नांवे** | **निशाणी** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

**ड. अभियोग पक्ष -**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| १. | फिर्याद | P1/PW1 |
| २. | छापील प्रथम खबर अहवाल | P2/PW1 |
| ३. | सुचनापत्र | P1/PW4 |
| ४. | घटनास्थळ पंच | P2/PW4 |
| ५. | सात बारा उतारा. | P1/PW5, P2/PW5 |
| ६. | सुचनापत्र | P3/PW5 |
| ७. | स्टेशन डायरीचा उतारा | P4/PW5 |

## इ. <u>बचाव पक्ष</u> -

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| --- | --- | --- |

## ई. <u>भौतीक वस्तु</u> -

| अनु.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| --- | --- | --- |

# न्यायनिर्णय

(दिनांक ०१.०९.२०२६ रोजी पारीत)

सदरचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ४३५ अन्वये चालविण्यात आला.

**<u>सरकार पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u> –**

२. फिर्यादी सौ.रत्नमाला वासुदेवराव बावणकर ही शेतमजुरीचे काम करते तसेच ती काजळसरा येथे राहते. सन २०२१ मध्ये तिने प्रणित हुस्नापुरे रा.काजळसरा यांचे शेत बटईने केले होते. प्रणित हुस्नापूरे यांचे दुस–या शेतातून तिने निम्बाच्या झाडाचे इंधन खरेदी केले. सदर इंधन तिने त्या शेतातून आणून बटईने केलेल्या शेताच्या धु–यावर आणून ठेवले. तसेच बटईने केलेल्या शेतातील तुरीच्या दोन ट्रॅक्टर तुरीचे फन सुध्दा तिने धु–यावर ठेवले होते.

३. दि.१५.०२.२०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास ती समोरच्या शेतात फा–या टाकत असतांना बटईच्या शेताच्या धु–यावर इंधन व तुरीचे फन हे शेजारील शेतकरी आरोपी नामे सौ.माया सिध्दार्थ मानेकर, रा.काजळसरा हिने माचीसच्या डब्बीने

आग लावून पेटवून दिले. त्यावेळेस फिर्यादीचे पती वासुदेवराव बावणकर, मोहन हुस्नापुरे, संजय कानेटकर व हडम्बा वरील मजुर हजर होते. आरोपी माया मानेकर हिने तिला काहीही न सांगता धु–यावरील इंधन व तुरीचे फन पेटवून दिल्याने फिर्यादीचे अंदाजे १५,०००/– रुपयाचे नुकसान झाले आहे. करीता तिने पोलीस स्टेशन, देवळी येथे फिर्याद दिली.

४. सदर फिर्यादवरुन आरोपीविरुध्द गुन्हा क्र.१६०/२०२१ भारतीय दंड संहिताचे कलम ४३५ अन्वये पोलीस ठाणे, देवळी, तालुका देवळी व जिल्हा वर्धा येथे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार मनोज गुलाबराव नांदुरकर, ब.क्र.९५ यांनी केला. तपासा दरम्यान त्यांनी दोन पंचांना घटनास्थळी बोलाविले व त्यांचे समक्ष घटनास्थळ पंचनामा केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीस अटक केली व दोन पंचांसमक्ष अटक फॉर्म तयार केला. त्यानंतर त्याने आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. दिनांक २७.०१.२०२६ रोजी आरोपीविरुध्द निशाणी क्र.१४ नुसार भारतीय दंड संहितेचे कलम ४३५ अन्वये दोषारोप निश्चित केले. तसेच सदर दोषारोपामधील मजकूर आरोपीला तिच्या भाषेमध्ये समजावून सांगितला. तिने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले म्हणून सरकारपक्षाची केस पुढे चालविली.

६. आरोपीविरुध्द अभियोग पक्षाच्या पुराव्यात गुन्हयाशी संबंध दाखविणारी परिस्थिती आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे आरोपीचा नि.क्र.२५ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला. तसेच आरोपीने तिचे विरुध्द खोटी केस दाखल केल्याचे सांगीतले.

७. दोन्ही पक्षांच्या वतीने करण्यात आलेला युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणातील वस्तुस्थिती व सादर पुरावा यावरुन खालील प्रश्न निर्णित कामी उपस्थित होतात, ज्यावरील निष्कर्ष नमूद कारणांसह पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकार पक्ष हे सिध्द करतात काय की दिनांक १५.०२.२०२१ रोजी दुपारी ४.३० ते ५.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी रत्नमाला बावणकर हिचे शेताच्या धु-यावर काजळसरा, ता.देवळी, जि.वर्धा येथे फिर्यादीच्या १५,०००/- रुपयाच्या किंमतीचे इंधन व तुरीचे फनाचे नुकसान करण्याच्या उद्देशाने किंवा तसे होण्याची शक्यता आहे हे माहित असूनही आग लावून नुकसान केले व त्याद्वारे त्याने भारतीय दंड संहितेचे कलम ४३५ नुसार गुन्हा केला? | **होकारार्थी.** |
| २. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

८. सरकार पक्षाने युक्तीवाद केला की सरकार पक्षाने तपासी अंमलदार यांचेसह एकुण ५ साक्षीदार तपासले असून सर्व साक्षीदारांनी त्यांचे फिर्याद व बयाणाप्रमाणे जसाचा तसा घटनेबाबतचा पुरावा दिलेला आहे. त्यामूळे फिर्यादी व साक्षीदाराचे फोडून काढले पुरावा बचाव पक्षाने आणला नाही. घटनास्थळ पंच याच्या मार्फत सिध्द केलेला आहे.

तसेच तपास अधिकारी यांनी घटनास्थळावर असलेले दोन्ही शेताचे मालकी दस्तऐवज अभिलेखावर आणलेले आहेत त्यामूळे सरकार पक्षाने आरोपीविरुध्दचा कलम ४३५ अंतर्गत गुन्हा संशयापलीकडे आरोपीनेच फिर्यादीचे रक्कम रु.१५,०००/– चे इंधन तिचे आरोपीचे व फिर्यादीचे बटईने केलेल्या दोन्ही शेताच्या मध्यभागी असलेल्या धु–यावर आगपेटीच्या काडीने जाळले व सदरची आगपेटी हि तिने त्याच आगीत टाकून दिली ही बाब सिध्द केलेली आहे.

९. बचाव पक्षाचा युक्तीवाद असा आहे की, आरोपीचे काजळसरा व वाटखेडा हे दोन्ही गाव भिन्न आहेत. आरोपीच्या नावाने काजळसरा व वाटखेडा या दोन्ही ठिकाणी शेतजमिन नाही. त्यामूळे आरोपी ही तेथील शेतजमिन तिचे नावे नसल्यामूळे त्या ठिकाणी गेली नाही व तिने असे ज्वलनशील काम केले नाही. बचाव पक्षाचा असाही युक्तीवाद आहे की बरेचसे शेतकरी त्यांचे शेतातील धु–यावर कचरा टाकून पेटवून देतात त्यामूळे आरोपीने सदर गुन्हा घटनास्थळावर फिर्यादीचे असलेले इंधन जाळून रक्कम रु.१५,०००/– नुकसान केलेले नाही. तेव्हा आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे.

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :**

१०. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाने मौखिक पुरावा आणला असून त्यामध्ये फिर्यादी (नि.क्र.१६) तिचे पुराव्यात असे आले आहे की, ती आरोपीस ओळखते व आरोपी तिच्या गावात राहते. दि.१५.०२.२०२१ रोजी दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास श्री. प्रणित हुस्नापुरे यांच्या बटईने केलेल्या शेताच्या धुऱ्यावर घटना घडली. त्यावेळी तिने शेताच्या धुऱ्यावर इंधन ठेवले होते. सदर इंधन तिने त्याच शेतातून जमा केले होते तसेच हुस्नापुरे यांच्या दुसऱ्या शेतातून विकत घेतले होते. ते

शेताच्या धु–यावर ठेवले होते. बटईने केलेल्या शेतात चना काढण्याचे काम सुरू होते. त्यावेळी आरोपी मायाबाई तेथे आली व तिने आगपेटीच्या सहाय्याने इंधन पेटवून दिले व त्यानंतर दुसऱ्याच्या शेतात निघून गेली. त्यामुळे तिचे अंदाजे रक्कम रु.१५,०००/– किंमतीचे इंधन जळून नुकसान झाले. त्यावेळी तिचे पती श्री. वासुदेवराव बावणकर (स.सा.क्र.२), श्री. मोहनराव हुस्नापुरे (स.सा.क्र.३), श्री. संजय कानेटकर व इतर बाहेरील गावातील लोक तेथे हजर होते. सदर घटनेची फिर्याद तिने दि.१६.०२.२०२१ रोजी देवळी पोलीस ठाणे येथे दाखल केले.

११. सदर साक्षीदाराचे पुराव्याप्रमाणेच तिचे पती वासुदेव मारोतराव बावणे उर्फ बावणकर यांनी त्यांचे पुराव्या सांगीतले की, फिर्यादी ही त्याची पत्नी आहे. तो आरोपी मायाबाई हिला ओळखतो व ती त्यांच्या गावात राहते. दि.१५.०२.२०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास हुस्नापुरे यांच्या शेतात घटना घडली. सदर शेत त्याने बटईने केले होते. त्यांनी हुस्नापुरे यांच्याकडून इंधन विकत घेतले होते व ते इंधन शेताच्या धुऱ्यावर ठेवले होते. त्यावेळी शेतामध्ये चना काढण्याचे काम सुरू होते. त्या शेतात फिर्यादी, मोहन हुस्नापुरे, संजू कानेटकर व हिडींबावरील मजूर शेतात हजर होते. शेतात ठेवलेले इंधन आरोपी मायाबाई हिने माचीसची काडी लावून पेटवून दिले व त्यानंतर ती तेथून दुसऱ्याच्या शेतात निघून गेली. सदर इंधन अंदाजे रु.१५,०००/– किंमतीचे होते व संपूर्ण इंधन जळून गेले होते. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. पोलिस दुसऱ्या दिवशी चौकशीसाठी आले होते व त्यांनी त्याचेकडे चौकशी करून त्याचे बयान नोंदविले.

१२. सरकार पक्षाने पुढे मोहन जानरावजी हुस्नापुरे (स.सा.क्र.३) यांचा पुरावा नोंदविला. त्यांचे असे म्हणणे आहे की, ते फिर्यादी रत्नमाला बावनकर हिला ओळखतात.

तसेच ती आरोपी मायाबाई हिलाही ओळखते. आरोपी तिच्या गावात राहते. साक्षीदाराचे शेत मौजा वाटखेडा शिवारात आहे. दि.१५.०२.२०२१ रोजी सदर शेत फिर्यादीकडे बटईने होते. त्या दिवशी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास साक्षीदाराच्या शेतात इंधन ठेवलेले होते. सदर इंधन फिर्यादीने खरेदी केलेले असून ते शेताच्या धुऱ्यावर ठेवलेले होते. त्यादिवशी शेतात चना पिक काढण्याचे काम सुरू होते. त्यावेळी साक्षीदार, फिर्यादी, फिर्यादीचे पती, संजय कानेटकर व इतर मजूर तेथे हजर होते. आरोपी तेथे आली व तिने आगपेटीच्या काडीने सदर इंधन पेटवून दिले व तेथे न थांबता पश्चिम दिशेने निघून गेली. आरोपी ही तिच्या आईच्या शेताची वाहिती करीत असल्यामुळे त्या शेताशी आरोपीचा संबंध येतो. आरोपीच्या आईचे शेत व सदर साक्षीदाराचे शेत यांच्यामध्ये एकच धुरा आहे. आरोपी वाहित असलेले शेत सदर साक्षीदाराच्या शेताच्या उत्तर दिशेला आहे. पोलिसांनी त्यांचेकडे चौकशी केली. सदर साक्षीदाराने आरोपीस न्यायालयासमक्ष ओळखलेले आहे.

१३. सदर गुन्हयाचा तपास तपास अधिकारी एम.जी.नांदुरकर, पोलीस स्टेशन देवळी येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत असतांना अपराध क्रमांक १६०/२०२१ ची केस डायरी तपासकामी प्राप्त झाली होती. त्यासोबत एफआयआर व तोंडी रिपोर्ट प्राप्त झाला होता. केस डायरी मिळाल्यानंतर ते पोलीस स्टाफसह घटनास्थळी गेले, फिर्यादीची भेट घेतली व फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळाचा पंचनामा पंचना सुचनापत्र देवून केला. सदरचे सुचनापत्र त्यांनी ओळखले असून त्यांचे म्हणण्याप्रमाणे घटनास्थळ हे फिर्यादीने बटईने घेतलेल्या शेतामध्ये, काजळसरा शिवारातील मौजा वाटखेडा येथील होते व त्यासाठी त्यांनी हजर केलेले पंच प्रल्हाद पांडुरंग भगत यांना सरकार पक्षाने तपासकामी हजर करुन त्यांचा पुरावा नोंदविलेला आहे. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात असे आले की

दि.१६.०२.२०२० रोजी त्यांना पंच म्हणून हजर राहण्याचे सुचनापत्र दिले असून ते न्यायालयासमोर कबुल केले असून ते P1/PW4 त्याप्रमाणे ते आरोपी माया मानेकर यांच्या शेतात गेले होते. आरोपी ही त्यांचेच गावात राहत असल्यामूळे ते तिला ओळखतात. आरोपीकडे असलेले शेत ते जवादे यांचे असून ती जवादे यांची मुलगी आहे. सदर घटनास्थळ पंचनामा इंधन पेटविल्याबाबतचा होता. सदरचा घटनास्थळ पंचनामा नि.क्र. P2/PW4 त्यांनी कबुल केला असून घटनास्थ्ळाचा नकाशा घटनास्थळावर तयार करण्यात आला होता.

१४. वरील सरतपासाची चर्चा बघता फिर्यादी, साक्षीदार, घ्झटनहास्थळ पंच व तपास अधिकारी यांचा पुरावा व घटनास्थळ पंचनामा नि.क्र. P2/PW4 बघता सदर पंचनाम्यात आग लावून नुकसान करण्याच्या पध्दतीबाबत नमुद असून आगपेटीची काडी लावून धु-यावरील इंधन व तुरीचे फन पेटवून देवून १५,०००/- रुपयाचे नुकसान करण्याबाबतचा असल्याचे नमुद आहे. सदर घटनास्थळ हे मौजा वाटखेडा शिवारातील मोहन जानरावजी हुस्नापुरे यांचे फिर्यादीने बटईने केलेल्या शेतातील धु-यावरील आहे. सदर धु-याजवळून उत्तर -दक्षीण शिव पांधण गेलेली असून पांधणाच्या पुर्वेस मोहन हुस्नापुरे यांचे शेत असून शेताचे धु-याला धुरा लागून उत्तरेस गुन्हयातील आरोपी माया सिध्दार्थ मानेकर हिने मक्त्याने केलेले शेत आहे. दोन्ही शेताचे धु-यावर खोल खड्डा असून तो २० X २० चौ.फुट इंधन व तुरीचे फन पुर्णपणे जळलेले दिसत आहे. पांधण ही ८ फुट रुंदीचे आहे. शिव पांधणाच्या पश्चिमेस पुररुषोत्तम बिजवार यांचे शेत आरोपीच्या शेतात तुरीचे पिक कापलेले दिसत आहे. फिर्यादी तिचे शेतात तुरीचे पीक कापलेले दिसत आहे.

१५. घटनास्थळ पंचनाम्यावरील नकाशा घटनास्थळावर काढल्याचे दर्शविलेले आहे. तेव्हा घटनास्थळ पंचनामा बघता फिर्यादीचा पुरावा तिने प्रणित हुस्नापुरे यांच्या बटईने केलेल्या शेताच्या धु-यावर त्याच शेतातून जमा केलेले इंधन तसेच हुस्नापुरे यांच्या दुस-या शेतातून विकत घेतलेले इंधन धु-यावर ठेवलेले होते. त्यावेळी बटईने केलेले शेतात चना काढण्याचे काम सुरु होते तेथे आरोपी आली व तिने इंधनाला आग लावून पेटवून दिले. असा पुरावा फिर्यादीने दिला असता बचाव पक्षाने त्याबबात घेतलेला उलटतपास फिर्याद देतेवेळी तिने बटईच्या शेताचे कागदपत्र, नक्कल प्रत पोलीसांना दिली नव्हती. तसेच आरोपी व फिर्यादी यांचे गावातील भानगडी मुळे पटत नव्हते ही बाब तिने नाकारली आहे. आरोपीच्या शेताचे सुध्दा तिने दस्तऐवज दिले नव्हते. ज्या धु-यावर घटना घडली तो धुरा हुस्नापुरे यांच्या मालकीचा आहे हे दाखविण्याकरीता तिचेकडे कागदोपत्री पुरावा नाही ही बाब तिने मान्य केली परंतु आरोपीचे नावे शेत नाही हे सुध्दा कबुल केल्यानंतर फिर्यादी सांगते की तिच्या आईच्या नावाने शेत आहे.

१६. तसेच सदर पुराव्यास घटनास्थळ पंच आरोपी हिचे कडे असलेले शेत जवादे यांचे असून ती जवादे यांची मुलगी आहे. तसेच मोहन (स.सा.क्र.४) सरतपासात सांगतात की आरोपीच्या आईचे शेत ही आरोपी वाहिती करीत असल्यामूळे व आरोपीच्या आईचे शेत व सदर साक्षीदाराचे शेत यामध्ये एकच धुरा आहे व त्या धु-यावर फिर्यादीने सदर साक्षीदाराकडून घेतलेले इंधन ठेवलेले होते. सदर तपासात तपास अधिकारी एम.जी.नांदुरकर यांनी सुध्दा घ्ज्ञटनास्थळ हे फिर्यादीने बटईने घेतलेल्या शेतामध्ये काजळसरा शिवारातील मौजा वाटखेडा येथील शेत होते. शेत हे मोहन व प्रणित हुस्नापुरे

यांच्या मालकीचे होते व आरोपी ही तिच्या आईच्या नावे बयाबाई जवादे यांचे शेत वाहत होते. घटनास्थळ व आरोपीच्या आईचे शेत हे लगतच्या धु-याला लागून आहे. त्यामूळे जरी बचाव पक्षाचा असा युक्तीवाद आहे की फिर्यादीच्या सदर शिवारात म्हणजेच मौजे काजळसरा व मौजा वाटखेडा या दोन्ही शिवारात शेत जमिन नाही ही बाब तपास अधिकारी यांनी मान्य केलेली आहे.

१७. याचाच अर्थ सर्व साक्षीदारांच्या पुराव्यावरुन फिर्यादीने बटईने घेतलेले शेत मौजे काजळसरा शिवारातील वाटखेडा गट क्र.१९९ ज्याचा सात बारा उतारा (नि.क्र.P2/PW5) तपास अधिकारी यांनी सादर केला आहे. त्या सात बारा उता-यावर गट क्र.१९९ चे मालक प्रणित हुस्नापुरे व मोहन हुस्नापुरे असून बयाबाई मोतीराम जवादे हिचे गट क्र.२०० मौजे वाटखेडा चा सात बारा उतारा (नि.क्र.P2/PW5) तपास अधिकारी यांनी अभिलेखवर आणलेले आहे.तेव्हा जरी फिर्यादीला बचाव पक्षाने तुम्ही फिर्याद देतेवेळी तुम्ही बटईने करत असलेल्या शेताचा तसेच आरोपीच्या शेताचा दस्तऐवज दिला नव्हता, सदरचा भाग हा तपासाचा भाग असल्यामूळे सदरचे दोन्ही शेतांचे ज्यमाध्ये घटनास्थळ आहे त्याचे सात बारा उतारे हे तपास अधिकारी यांनी अभिलेखावर आणले व गट क्र.२०० हा मोहन व प्रणित हुस्नापुरे यांचा असून गट क्र.१९९ हा बयाबाई जवादे जे की तपासात फिर्यादी तिची आई आहे हिचा असून घटनास्थळ पंचनाम्यावरील नकाशानुसार मोहन हुस्नापुरे यांच्या शेताचे उत्तर दिशेस आरोपीने मक्त्यने केलेले शेत म्हणजेच गट क्र.१९९ जो की बयाबाई जवादे आरोपीच्या आईचा अभिलेखावर आणलेले आहे. सदरच्या दोन्ही बाबी बचाव पक्षाने पुराव्याकामी फोडून काढलेल्या नाही. तेव्हा बचाव पक्षाने इतर घेतलेला

पुरावा बघता आरोपी व हुस्नापूरे यांचे आपसात जमत नाही अशी सुचना दिली असतांना मोहन हुस्नापुरे यांना फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये संबधाबाबत सुचना दिली असून त्यांचे बरेच दिवसांपासुन एकमेकांशी पटत नाही. परंतु मोहन सा.क्र.३ यांना त्याबाबतची कोणतीही सुचना की त्यांचे व आरोपीचे आपंसात जमत नाही अशी दिलेली नाही कारण फिर्यादीने आरोपी व हुस्नापुरे यांचे आपसात जमत नाही याबाबत तिला माहिती नाही असे उलटतपासात सांगीतले होते. परंतु आरोपी व फिर्यादी यांचे गावातील भानगडीमूळे पटत नव्हते ही बाब फिर्यादीने नाकारलेली आहे.

१८. तसेच फिर्यादीचे पती वासुदेव सा.क्र.२ यांना आरोपी व श्री.हुस्नापुरे यांची पत्नी यांचे एकमेकांशी पटत नाही अशी सुचना दिली त्यावेळी सुध्दा सदर साक्षीदाराने त्यांना माहित नाही असे कबुल केलेले आहे. हुस्नापूरे यांची पत्नी व फिर्यादी या दोघी मैत्रीणी असल्याचे फिर्यादीच्या पतीच्या पुराव्यातुन उलटतपासातून आणले व हुस्नापूरे यांच्या पत्नीच्या सांगण्यावरुन फिर्यादी यांनी खोटा रिपोर्ट दिला अशी सुचना दिली ती सुचना फिर्यादीचे पती वासुदेव (स.सा.क्र.२) यांनी स्पष्टपणे नाकारलेली आहे. तेव्हा बचाव घेतेवेळी बचाव पक्षाचे एका ठिकाणी हुस्नापुरे व आरोपी यांचेमध्ये फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये तसेच फिर्यादी व मोहन हुस्नापुरे यांचे पत्नीचे असलेले संबध अभिलेखावर आणून सदरचे संबधामूळे आरोपी यांचा त्यांचेशी एकमेकांशी पटत नसल्याने सदरची खोटी फिर्याद दाखल करण्याचा बचाव आणण्याचा प्रयत्न केला परंतु त्याबाबत अभिलेखावर असलेला कोणताही पुरावा हा साशंक दृष्टीने पाहण्यालायक नाही कारण जर का फिर्यादी व तिचे पती यांनी मोहन हुस्नापूरे यांचे शेत बटईने घेतले आहे तर त्यांचेमधील संबध चांगले असणारच.

परंतु त्या तिघांचेही आरोपीशी सबंध वाईट असल्याबाबतचा व त्या दुरभावनेने सदरची फिर्याद दाखल केल्याचा जो काय बचाव अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न निष्फळ ठरतो.

१९ घटनास्थळ पंच व तपास अधिकारी यांनी त्यांचे समक्ष तयार करण्यात आलेला पंचनामा हा मौजा काजळसरा शिवारातील वाटखेडा बघता फिर्यादीने बटईने केलेली शेतजमिन ही शीव पांधण रस्त्याचे पुर्व बाजुस असून सदरचा पांधण रस्ता हा दक्षिण उत्तर वाहतो. आरोपी हिने मक्त्याने केलेले शेत म्हणजेच गट क्र.१९९ हे मोहन (स.सा.क्र.३) यांचे गट क्रमांक २०० च्या उत्तर बाजुस आहे व घटनास्थळ हे मोहन हुस्नापुरे व बयाबाई जवादे यांचे शेताचे पश्चिम बाजुस असलेल्या धु-यावर असून मोहन (स.सा.क्र.३) यांनी सांगीतले की, 'आरोपी आली व तिने आगपेटीच्या काडीने सदरचे इंधन पेटवून दिले व तिथे न थांबता पश्चिम दिशेने निघून गेली'. तेव्हा घटनास्थळाच्या पश्चिम दिशेला शीव पांधण रस्ता आहे. तसेच फिर्यादीने सुध्दा आरोपी तेथे आली, तिने आगपेटीने इंधन पेटवून दिले व दुस-याच्या शेतात निघून गेली. वासुदेव मारोतराव बावणकर सा.क्र.२ यांचे पुराव्यात इंधन आरोपी मायाबाई हिने माचिसची काडी लावून पेटवून दिली व त्यानंतर ती तेथून दुस-याचे शेतात निघून गेली असा पुरावा दिला असून सदर बाबत बचाव पक्षाने उलटतपासात कोठेही त्याबाबतचा खोडून काढणारा पुरावा आणलेला नाही कारण आरोपीने उलटतपासात बरेच शेतकरी त्यांचे शेतातील कचरा हा धु-यावर टाकून पेटवून देतात तसेच आरोपी सदर शेताची मालक नसल्यामूळे ती त्या ठिकाणी गेली नाही व तिने असे ज्वलनशील काम केले नाही. तसेच शेताचे धु-यावर इंधनाची गंजी ठेवलेली नव्हती व ती आरोपीने पेटविली नाही. तसेच फिर्यादी हिला उलटतपासामध्ये तिने हुस्नापुरे व आरोपीच्या

शेतामधील धु-यावर कोणतेही इंधन ठेवले नव्हते या व्यतिरीक्त कोणतीही सुचना दिलेली नाही.

२०. फिर्यादीचे पती वासुदेव (स.सा.क्र.२) यांचे उलटतपसामध्ये आरोपीने इंधन पेटवून दिले व त्यायोगे आरोपीने रक्कम रु.१५,०००/- फिर्यादीचे नुकसान केले याबाबत कोणतीही सुचना दिली नाही. तेव्हा घटना ही दि.१५.०१.२०२१ रोजी ४.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादीने बटईने घेतलेल्या शेताचे इंधन व विकत घेतलेले इंधन रक्कम रु.१५,०००/- हे घटनास्थळ पंचनाम्याप्रमाणे गट क्र.२०० व १९९ च्या धु-यावर ठेवलेले होते व ते आरोपीने आगपेटीच्या काडीच्या सहाययाने पेटवून दिले व ती वस्तु इंधनामध्येच टाकून दिली असे तपास अधिकारी यांनी तपासामध्ये व पुराव्यामध्ये सांगीतलेले आहे. परंतु सदरची घटना घडतेवेळी फिर्यादी तिचे पती वासुदेव (स.सा.क्र.२), मोहन (स.सा.क्र.३) यांनी दिलेला पुरावा बचाव पक्षाने खोडून र्काढलेला नसुन ते घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. घटना ही त्यांचे समक्ष घडलेली असून बचाव पक्षाने त्यांचा पुरावा खोडून काढण्याइतपत कोणताही बचाव अभिलेखावर आणलेला नाही. तेव्हा भारतीय दंड विधान कलम ४२५ निश्चीत *whoever with intent to cause of knowing that he is likely to cause, wrongful loss or damage to the public or to any person, causes the destruction of any property or any such change in the property or in the situation thereof as destroys of diminishes its value or utility or affects its injuriously commits, mischief* अशी असून कलम ४३५ प्रमाणे सदरचे फिर्यादीचे धु-यावर असलेले इंधन रक्कम रु.१५,०००/- याबाबत जरी कागदोपत्री पुरावा

रक्कमेबाबत अभिलेखावर आला नसला तरी फिर्यादी व साक्षीदारांच्या पुराव्यावरुन सदरचे इंधन हे फिर्यादीने तिने बटईने घेतलेल्या शेतातून तसेच मोहन (स.सा.क्र.३) यांचे शेतातील इंधन खरेदी केलेले असल्याचे सिध्द होते. तेव्हा सदरचे इंधन हे आरोपीने जाळतेवेळी तिला ते जाळल्यामूळे नष्ट होणार आहे याची संपुर्ण माहिती व खात्री होती असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही व त्या इंधनाचे नुकसान आरोपीने जाणुनबुजुन आगपेटीच्या काडीने तिने बटईने घेतलेल्या शेताच्या धु-यावर जाळून टाकले ही बाब सरकार पक्षाने अभिलेखावर सबळ पुराव्यानिशी सिध्द केलेली आहे. तेव्हा भा.द.विचे कलम ४३५ चे तत्व सरकार पक्षाने आरोपीविरुध्द सदरचे इंधन हे दैनंदिन वापरसाठीचे असून खरेदी केलेले आरोपीने आगपेटीच्या सहाय्याने खात्रीलायक रित्या जाळून नष्ट केले ही बाब सिध्द होत असल्याने आरोपी दोषसिध्दीस पात्र आहे. तेव्हा मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

२१. सदरचा गुन्हा हा जाणुनबुजुन फिर्यादीस नुकसान पोहचावे या उद्देशाने केला असल्यामूळे आरोपीस कलम ४ परिविक्षा अधिनियमाचे लाभ देणे योग्य होणार नाही तेव्हा तो लाभ नाकारण्यात येतो.

२२. न्यायनिर्णय आरोपी व सरकार पक्ष यांचे शिक्षेबाबतचे युक्तीवादाकरीता थांबविण्यात येतो.

MRUNAL YASHWANT DOIPHODE
Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.09.01 17:13:43 +0530

वर्धा (श्रीमती एम.वाय.डोईफोडे)
दिनांक ०१.०९.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा.

२३. सरकार पक्षाचा युक्तीवाद आहे की, शिक्षा सिध्दीचे प्रमाण तसेच कमी आहे. लोकांना न्याययंत्रणेवर विश्वास रहावा तसेच तपास अधिकारी यांचे तपासास श्रेय मिळावे

जेणेकरुन तपासाच्या अनुशंगाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द होवून आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा समाजातील लोकांवर शिक्षेबाबत कायदयाचा धाक रहावा म्हणून आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी. फिर्यादी सुध्दा दुस-याचे मक्त्याने शेत करणारी महिलाच होती. तिचे सुध्दा रु.१५,०००/- नुकसान केले असल्यामूळे तिला जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळावी.

२४. आरोपीतर्फे श्री.बी.डब्लु, चौधरी यांनी युक्तीवाद केला की, आरोपी ही वयोवृध्द महिला आहे. तिच्याकडे उत्पन्नाचा स्त्रोत नाही ती तिचे दैनंदिन उत्पन्न हे मजुरीवरच अवलंबून आहे. आरोपी ही सराईत गुन्हेगार नाही. गावातील राजकारणामुळे तिला खोटया केसमध्ये गुंतविले आहे. तेव्हा तिच्या वयाचा व आर्थिक परीस्थीतीचा विचार करुन शिक्षेमध्ये व नुकसानभरपाईमध्ये शिथिलता मिळावी.

२५. आरोपी स्वतः तिचे म्हणणे आहे की तिला अपील करावयाची असल्यामूळे मला जामिन देण्यात यावे. तसेच वयाचा विचार करता कमीत कमी शिक्षा देण्यात यावी.

२६. वरील युक्तीवाद ऐकता आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द झालेला आहे. आरोपीने फिर्यादीचे विकत घेतलेले इंधन केवळ तिचे धु-यावरती ठेवले असल्यामूळे जाळून टाकले व रक्कम रु.१५,०००/- चे नुकसान केलेले आहे. सदर भां.द.वि.चे कलम ४३५ या गुन्हयास ७ वर्षापर्यतच्या शिक्षेचे प्रावधान व द्रव्यदंडाची शिक्षा दिलेली आहे. सरकार पक्षाचा युक्तीवाद बघता यात शंका नाही की सध्या गुन्हा शाबीतीचे प्रमाणे कमी झालेले आहे. सदरचा गुन्हा आरोपीविरुध्द सिध्द झाला असून आरोपीने फिर्यादीचे रक्कम रु.१५,०००/- नुकसान केलेले आहे. परंतु आरोपीचा जन्म १९६२ सालचा असून गुन्हा हा सन २०२१ चा आहे.

आरोपी आज ६५ वर्ष वयाची असून महिला म्हणून वयाचा विचार करता गुन्हयात दिलेली शिक्षा जरी ७ वर्षापर्यत व द्रव्यदंडाची असली तरी आरोपी ही महिला व तिच्या वयाचा विचार करुन आरोपीस शिक्षेत शिथीलता देण्यात येते. तेव्हा आरोपीस दोन वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व द्रव्यदंड रक्कम रु.१५,०००/- देणे न्यायोचित होईल. द्रव्यंदडातून फिर्यादीची नुकसानभरपाई देता येईल.

**मुद्दा क्र.२ करीता :**

२७. मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षानंतर असे लक्षात येते की आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द झाला असून मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी माया सिध्दार्थ मानेकर हिस फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८ (२) प्रमाणे भा.दं.वि.च्या कलम ४३५ चे शिक्षापात्र गुन्हयाकरीता सिध्द दोषी अपराधी घोषीत करण्यात येते.

२. आरोपीस भारतीय दंड संहिताचे कलम ४३५ करीता २ वर्ष सक्त मजुरी कारावासाची शिक्षा व रक्कम रुपये १५,०००/– द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. द्रव्यदंडाची रक्कम वसुल न झाल्यास ३ महिने साध्या कारावासाची अतिरीक्त शिक्षा भोगावयाची आहे.

३. द्रव्यदंडाची रक्कम रु.१५,०००/– नुकसानभरपाई म्हणून फिर्यादीस देण्यात यावी.

४. आरोपीचे पुर्वीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

५. न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

MRUNAL YASHWANT DOIPHODE

Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.09.01 17:13:50 +0530

वर्धा (श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

दिनांक ०१/०९/२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of steno | : | R.V.Sirsikar Gr.II |
| Court Name | : | Ct. of Chief Judicial Magistrate, Wardha |
| Judgment Date | : | 01.09.2026 |
| Dictated on | : | 01.09.2026 |
| Typed on | : | 01.09.2026 |
| Checked & Signed by Presiding officer on | : | 01.09.2026 |
| Uploaded on | : | 01.09.2026 |